# सावित्री फातिमा कुटुंब स्वास्थ्य योजनेचे नियम व अटी

**Cashless Reimbursement Scheme for Teaching & Non-Teaching Staff In Aided School & Jr. Colleges**

१. सदर योजनेचा लाभ महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम ; १९६१ अन्वये व त्यानुसार वेळोवेळी निर्गमित केलेले नियम सुधारणेनुसार अवलंबून असणारे कुटुंबातील सभासद स्वतः व कुटुंबातील अवलंबून असलेले पती / पत्नी, पहिले दोन अपत्य, दि १ मे,२००१ पूर्वीचे अवलंबून असलेले तिसरे अपत्य तसेच अवलंबून असलेले आईवडील. (आईवडील /सासू सासरे महीला कर्मचाऱ्या बाबतीत) या व्यक्तींना योजनेचा लाभ घेता येईल.

२. जर कर्मचाऱ्यावर अवलंबून असणाऱ्या अपत्याचे वय २५ किंवा २५ वर्षापेक्षा जास्त असेल किंवा तो नोकरीस असेल किंवा लग्न झालेले असेल तर त्यास योजनेचा लाभ घेता येणार नाही तसेच अवलंबून अपत्याला जर जन्मापासून स्थायी अपंगत्व असेल तर त्यास या योजनेचा लाभ घेता येईल व त्यास वयाची अट असणार नाही.

३. १ मे २००१ पूर्वी ३ अपत्यापेक्षा जास्त वा १ मे २००१ नंतर २ अपत्यापेक्षा जास्त अपत्य असल्यास कुटुंबनियोजन प्रमाणपत्र नोंदणी अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. अन्यथा कर्मचारी व कर्मचाऱ्यावर अवलंबून असणाऱ्या पती अथवा पत्नी त्यांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही.

४. पती- पत्नी दोघेही कार्यरत असल्यास त्यापैकी एकानेच मुलांची माहिती नोंदणी अर्जात भरावी.

५. तात्काळ वैद्यकीय उपचारासाठी लाभार्थी योजनेचे छायांकित ओळखपत्र घेऊन नेटवर्क रुग्णालयात प्रवेश.(विना ऍडव्हान्स किंवा डिपॉझिट)

६. छायांकित ओळखपत्र दाखविल्यास सदर योजनेचा लाभ महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम ;१९६१ अन्वये व त्यानुसार वेळोवेळी निर्गमित केलेले नियम सुधारणेनुसार जाहीर केलेल्या २७ आकस्मित आणि ५ गंभीर आजारांसाठी पहिल्या प्रवेशासाठी २ लाख तसेच दुसऱ्या प्रवेशासाठी २ लाख आणि तिसऱ्या प्रवेशासाठी १ लाख एवढ्या रक्कमेची मर्यादा असेल. तसेच वार्षिक एका व्यक्तीस ५ लाख मर्यादा असेल. (नादेयकांचा यात समावेश होणार नाही.)

७. रेशनकार्ड आणि सेवापुस्तिका मध्ये कर्मचारी अथवा त्याच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तीचे नाव असणे बंधनकारक आहे. (महिला कर्मचारी बाबतीत आई-वडील सासु-सासरे यापैकी एकाची सेवापुस्तिकेत नोंद असणे आवश्यक आहे.)

८. कर्मचाऱ्यावर अवलंबून असलेले आई-वडील किंवा महिला कर्मचाऱ्याच्या बाबतीत आई-वडील/सासु-सासरे राज्य/केंद्रसरकारी व निमसरकारी सेवेतुन सेवानिवृत्त झालेले असल्यास व त्यांना निवृत्ती वेतन मिळत असेल/नसेल तरी अन्य मार्गानी उत्पन्न मिळत असेल किंवा निवृत्ती वेतनासाह अन्य मार्गानी उत्पन्न मिळत असेल तरी ही अशा सर्व प्रकरणी उपचार घेतेवेळी त्याचे सर्वमार्गानी मिळणारे एकूण उत्पन्न हे दरमहा रु. ९०००/- इतके मुळनिवृत्ती वेतन घेणारया सेवानिवृत्ती राज्य शासकीय कर्मचाऱ्याला मिळणाऱ्या उपलब्धिच्या मार्यादेत {म्हणजे रु ९०००/- अधिकत्यावरील उपचार सुरु करण्याच्या दिनांकास अनुज्ञेय असणारी महागाई वाढ} इतकेच आहे. त्यापेक्षा जास्त असल्यास त्यांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही.

९. महाराष्ट्रातील नेटवर्क रुग्णालयामध्ये दाखल झाल्यापासून ते डिस्चार्ज पर्यंतचा खर्च कॅशलेश केले जाईल. या व्यतिरिक्त फार्मसी / OPD / OPD Reports/ मासिक/ साप्ताहिक अथवा बाह्य रुग्ण तपासणी देय

१०. कर्मचाऱ्यांना त्यांच्या पदानुसार पात्र असणाऱ्या (वैद्यकीय देखभाल नियम ;१९६१) वैद्यकीय वर्गामध्ये प्रवेश व औषधोपचार दिले जातील. पात्र नसणाऱ्या वैद्यकीय वर्गामध्ये प्रवेश घेतल्यास अतिरिक्त फरकाची रक्कम रुग्णालयात भरणा करण्यास कर्मचारी बांधिल राहील. [अश्या रक्कमेची प्रतिपुर्ती देय नाही.]

| ग्रेड पे | वार्ड |
|---|---|
| ६६०० पेक्षा जास्त | प्रायव्हेट |
| ४४०० ते ६५९९ | सेमी प्रायव्हेट |
| ४३९९ पेक्षा कमी | जनरल |

११. सदर योजनेचा लाभ कार्यरत शासकीय कर्मचारी संपूर्ण महाराष्ट्रातील उत्तम दर्जाच्या नेटवर्क रुग्णालयात वैद्यकीय उपचार घेऊ शकतात. तसेच रुग्णालयात उपचार घ्यायचे असल्यास निर्धारित केलेल्या यादीमध्ये नमूद असलेल्या रुग्णालयात उपचार घेणे अनिवार्य असेल यादी व्यतिरिक्त रुग्णालयात उपचार घेतल्यास या योजनेचा लाभ घेता येणार नाही.

१२. कर्मचारी अथवा त्याच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तीने IPD कॅशलेस सुविधा घेतल्यानंतर रुग्णालयातून डिस्चार्ज घेण्यापूर्वी रुग्णालयामध्ये सॅलरी अकाउंटचे २ चेक व वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची प्रत सुपूर्त करणे बंधनकारक राहील. (टीप:- एक चेक कंपनीसाठी देणे व दुसरा चेक जे कर्मचारी ज़िल्हा परिषद व्यतिरिक्त इतर शाळेवर रुजू आहेत त्या शिक्षकांना सिविल हॉस्पिटल साठी लागणारे ३% स्वतः अदा करावे लागतील.)

१३. वैद्यकीय उपचार घेतल्यानंतर वैद्यकीय प्रतिपूर्ती देयक युनिक हेल्थकेअर मार्फत तयार केले जाईल. सदर प्रस्ताव कर्मचाऱ्याने ३ दिवसाच्या आत स्वाक्षरी सहित कार्यालयाच्या आस्थापनेत सादर करणे बंधनकारक आहे. ( किमान ३ दिवस व कमाल ८ दिवस कालावधीमध्ये देयक सादर न केल्यास देयकाची पूर्ण रक्कम कर्मचाऱ्याकडून घेण्यात येईल.)

१४. कर्मचाऱ्यांचे वैद्यकीय देयक जिल्हा चिकित्सालया मधून प्रमाणित झाल्यावर किमान ८ दिवसामध्ये कार्यालयात सादर करणे बंधनकारक आहे.

१५. वैद्यकीय देयक कार्यालयात दाखल करते वेळेस मुख्याध्यापकांचे कव्हरिंग लेटर घेणे आवश्यक आहे.

१६.शाळेला १००% अनुदान असल्याचे पत्र आणि वैयक्तिक मान्यता पत्र (Approval Copy) बंधनकारक आहे.

१७. वैद्यकीय बिलाची रक्कम मंजूर झाल्यानंतर कंपनीला कळविणे बंधनकारक आहे. जमा झालेली रक्कम चेकद्वारे काढते वेळी चेक Bounce झाला तर कर्मचाऱ्यास १००० रुपये दंड भरावा लागेल आणि १००० रुपये रक्कम ३ दिवसाच्या आत UHMS ला दयावी लागेल अन्यथा ५००० रु. दंड द्यावा लागेल.

१८. कर्मचाऱ्याने योजनेत सहभागी झाल्यांनतर एक महिन्यांनतर धारकास योजनेचा लाभ घेता येईल.